# महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्य विषयक संकल्पना

**जयसिंह सुभाष ओहोळ,** संशोधक विदयार्थी, राज्यशास्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

---

## प्रस्तावना

एकविसाव्या शतकात आधुकनिकतेच्या युगात जग आज पादाक्रांत करत असताना आजही भारत देशाची ओळख हि जागतिक स्तरावर खेड्यांचा देश म्हणून आहे. देशात खेड्यांची संख्या सात लाख इतकी आहे. प्राचीन काळात भारतीय खेडी हि स्वयंपूर्ण, सुस्थितीत आणि स्वावलंबी होती.मात्र ब्रिटिशांच्या आगमनानंतर वासाहतिक कालखंडात आधुनिक पाश्चात्य यांत्रिकीकरणामुळे खेडोपाडी असणारी स्वयंपूर्ण व्यवस्था पूर्णतः कोलमडून पडली.स्वातंत्र्योत्तर भारतात घटनाकारांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातुन पंचायतराज हि व्यवस्ता स्वीकारून महात्मा गांधी यांच्या ग्रामस्वराज्य स्वकल्पनेला मूर्त स्वरूप दिले. आज आपण भारतीय स्वातंत्र्यास ७५ वर्ष पूर्तीनिमित्त सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करत असताना .अनेक खेडोपाडी आजही मानवी जीवनास मूलभूत आवश्यक असणाऱ्या गरजापासून वंचित राहावे लागते . रस्ते,पाणी आणि वीज आजही अनेक गावामध्ये पोहचली नाही.हि वस्तुस्थिती गेल्या ७५ वर्षात बदललेली नाही.पूर्वी स्वयंपूर्ण ,सुस्थितीत असणारी गावे आज त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांनी देशभरातील गावे हि दयनीय स्थितीत आहे. रोजगार ,सोयीसुविधा अभावी गावातील लोक शहराकडे आकर्षित होऊन गावे हि दिवसेंदिवस ओस पडलेली दिसतात. गावाकडून शहराकडे होणाऱ्या स्थलांतराच्या प्रमाणात वाढ होऊन शहरांवर प्रचंड ताण निर्माण होऊन यातून प्रदूषण ,कचरा ,झोपडपट्टीचे बकाल वास्तव्य ,यासारख्या अनेकआरोग्यविषयक गंभीर समस्या निर्माण होत आहेत. या मानव निर्मित समस्या सोडवण्यासाठी आज महात्मा गांधी यांच्या संकल्पनेतील ग्रामस्वराज्य विषयक विचार मार्गदर्शक ठरतात .

## संशोधनाची उद्दिष्ट्ये -

१. महात्मा गांधी यांच्या विचारातील ग्रामस्वराज्य या संकल्पनेचा अभ्यास करणे.

२. बदलत्या आधुनिक काळात गावांची सद्यस्थिती ,समस्या समजून घेणे.

३. महात्मा गांधी यांच्या संकल्पनेतील ग्रामस्वराज्य विचारांची प्रासंगिकता अभ्यासणे .

## प्रस्तुत विषयासंबंधी पूर्व संशोधन -

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने खालील साहित्य संदर्भ उपलब्ध आहेत ते पुढीलप्रमाणे.

1.देशमुख ममता २०१८

यांनी महात्मा गांधीच्या 'ग्रामस्वराज्य विषयक विचारांची प्रासंगिकता :एक विशलेषण' या विषयावर संशोधन केले असून एकूण ग्रामस्वराज्य संकल्पनेचे विविध आयाम ,सद्याच्या युगात महात्मा गांधी यांच्या विचारांची प्रासंगिकता स्पष्ट करून अत्यन्त सखोल अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे.

२. आर .के.प्रभू २०१९

यांनी पंचायत राज ग्रंथात महात्मा गांधी यांच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेची स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर अशा दोन कालखंडत ग्रामस्वराज्य या संकल्पनेची मांडणी केली आहे .

## गृहीतके --

१.महात्मा गांधी यांचे ग्रामस्वराज्य विषयक विचार हे कालसुसंगत आहेत.

२. ग्रामीण भागातील बहुतांशी लोकसंख्या हि शेती उद्योग व पूरक व्यवसायात गुंतलेली असते.

३. शहर व ग्राम स्तरावर विकसित अविकसित असे असमान द्वंद्व निर्माण झाले आहे.

## तथ्य संकलन व संशोधन पद्धती -

सदरच्या शोध निबंधासाठी विशेषतः महात्मा गांधी यांच्या संकल्पनेतील ग्रामस्वराज्य विषयक संकल्पना हा अभ्यासाचा मुख्य उद्देश असून शोधनिबंधासाठी महात्मा गांधी यांची ग्राम स्वराज्य संकल्पना ,ग्रामीण स्तरावरील समस्या ,शहरांचे विकसित प्रारूप ,यांचा विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केला असून तथ्यसंकलनासाठी द्वितीय माहिती स्रोत म्हणून विविध संदर्भ ग्रंथ ,वेबसाईट ,मासिके या साधनांचा आधार घेतला आहे.

**विषय विवेचन :**

**महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्याची सांकल्पना :**

महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्य संकल्पना हि व्यपाक अशी सर्वांगीण प्रगतीचा अंतर्भाव असणारी होती. यामध्ये विकेंद्रित समाजाची निर्मिती करून एक आत्मनिर्भर अशी ग्रामव्यवस्था निर्माण करण्याची दूरदृष्टी होती. हि ग्रामव्यवस्था पुर्वपार चालत आलेली जातीय अन्यायमूलक नसून ती सर्वांगीण कल्याण साधणारी सर्व समाजास एकसूत्रात सूत्रबद्ध करणारी होती. गांधीजींच्या संकल्पनेतील ग्रामस्वराज्य म्हणजे केवळ ग्राम स्व'शासन असा मर्यादित नसून यामध्ये गावे हि स्वयंशासित ,स्वावलंबी ,आणि स्वयंपूर्ण होतील असा दूरगामी विचार होता. महात्मा गांधीजींच्या मते ग्रामीण विकासाच्या संदर्भात शासनाची जबाबदारी हि विश्वस्ताची असावी. शासनाने गावच्या व्यवहारात ढवळाढवळ करू नये;परंतु आवश्यक पायाभूत सोइ ,गावातील उद्योगासाठी पतपुरवठा ,शेतीसाठी बियाणे ,प्रशिक्षण ,कौशल्य विकास ,बाजारव्यवस्था या बाबतीत मदतीची भूमिका बजावावी.

**ग्रामस्वराज्य संकल्पनेतील घटक -**

**१. समानता :**

महात्मा गांधी यांच्या संकल्पनेतील ग्रामव्यवस्था हि रुढीबध्द जातीयतेची अनुकरण करणारी नव्हती तर स्त्री पुरुष सर्वांना सामानतेची वागणूक देणारा विचार होता. यामध्ये कोणाचे कोणाकडून शोषण होणार नाही. समाजात श्रीमंत गरीब असे वर्ग असणार नाहीत.सामाजिक स्तरावर सर्वविना सामान अधिकार व हक्क असतील. समाजामध्ये कोणताही सामाजिक व आर्थिक असा भेद न राहता सर्व समाजघटकात एकतेचे ,बंधुतेचे सूत्र असेल.या विचारास प्राधान्य देऊन महात्मा गांधी यांनी अस्पृस्यता निवारणासाठी प्रयत्न केले. तळागाळातील समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतला.

**२. खेडे /गाव :**

**''खरा भारत हा देशातील सात लाख खेड्यामध्ये वसला आहे ;खेडी हा भारताचा आत्मा आहे ;खेड्यांचे भविष्य म्हणजेच भारताचे भविष्य ...!''**

हे महात्मा गांधी यांचे विचार खेड्यांचे महत्व अधोरेखित करतात. महात्मा गांधी यांच्या ग्राम स्वराज्य संकल्पनेत खेडे हे केंदस्थानी होते. गावातील शासन कारभार हा सर्वस्वी गावातील लोकांच्या हातात असेल. गाव हे आत्मनिर्भर ,स्वयंशासित ,असेल. ग्रामस्तरावर असणाऱ्या समाजघटकातील प्रत्येक व्यक्ती हा स्वावलंबी असेल.

**३. श्रमदान :**

महात्मा गांधी ग्रामस्वराज्य संकल्पनेत आदर्श खेडे निर्माण कसे होईल .यावर भर देतात . गावातील प्रत्येक व्यक्ती हि सुखी असेल ,विविध रोगराई पासून गावे हि मुक्त असतील.प्रत्येकाचे आरोग्य सदृढ असेल.यासाठी महात्मा गांधी गावातील सर्वांना सामुदायिक श्रमदान करण्याचे आवाहन करतात.या सामूहिक श्रमदानातून सर्व गावातील लोक एकत्र येतील यातून आपसात बंधुभाव वृद्धिगत होईल.श्रमदानातून गावाची स्वछता राखली जाईल.

**४. कुटीरउद्योग व सहकारी तत्वावर शेती :**

भारतातील खेडी आजही व्यवसायिकदृष्ट्या शेतीवर अवलंबुन आहेत.या शेती व्यवसायात महात्मा गांधी ग्रामस्वराज्य संकल्पनेत बदल सुचवतात.पूर्वापार पद्धतीने व्यक्तिगत शेती न करता सर्व गावातील लोकांनी एकत्र येऊन सहकारी तत्वावर सामूहिक शेती करण्याचे आवाहन करतात.या शेतीवर आधारित कुटीरउद्योग निर्माण करून या सामूहिक सहकारी तत्त्वावरील शेतीतून उत्पन्न वाढ होईल.गावातील बेरोजगारीवर मात करता येईल.

**५. विकेंद्रीकरण :**

ग्रामस्वराज्य संकल्पनेत राजकीय सत्ता व आर्थिक बाबतीत विकेंद्रीकरण हा मूलभूत विचार आहे. सत्तेचे व संपत्तीचे कोणत्याही स्वरूपात केंद्रीकरण झाले नाही पाहिजे.सत्तेचे अथवा संपत्तीचे केंद्रीकरण झाल्यास शोषण करणारी व्यवस्था निर्माण होते हा विचार महात्मा गांधी यांच्या ठायी असल्याचे दिसुन आर्थिक व राजकीय दृष्टीने खेडी हि पूर्णतः स्वयंपूर्ण असावेत .राज्याची गावासंदर्भात जबाबदारी हि मर्यातीद स्वरूपाची असेल.

**६. राज्य विश्वस्त संकल्पना :**

राज्याची जबाबदारी हि विश्वस्ताची असावी.असा विचार व्यक्त करून गांधीजी राज्याची सत्ता मर्यादित करतात. शासनाने गावच्या व्यवहारात ढवळाढवळ करू नये;परंतु आवश्यक पायाभूत सोइ ,गावातील उद्योगासाठी पतपुरवठा ,शेतीसाठी बियाणे ,प्रशिक्षण ,कौशल्य विकास ,बाजारव्यवस्था या बाबतीत मदतीची भूमिका बजावावी. राजकीय सत्ता ही साध्य नव्हे तर साधन आहे, असे गांधीजींचे मत होते.

**गृहीतक पडताळणी :**

सद्यस्थितीत भारतातील गावांची स्थिती पाहता गावे स्वयंपूर्ण न राहता पूर्णतः शहरावर परावलंबी बनले आहेत. आजही देशातील ६० टक्के लोक्संख्या हि ग्रामीण भागात वास्तव्य करते.करते शिवाय हे सर्व लोक कृषी व्यवस्थेशी जोडले आहेत. शेतीपूरक व्यवसाय व त्यावर अवलंबून असणारे कुटीरउद्द्योग देखील बंद पडले आहेत.रोजगाराअभावी गावाकडून शहराकडे स्थलांतर होत असल्याने गावे ओस पडत आहे.यातून शहरे हि दिवसेंदिवस विकसित होत आहेत. तर गावे हि अविकसित परावलंबी होत आहेत.आज शहरांचा तुलनेत ग्रामीण स्तरावर आरोग्य.रस्ते पाणी,वीज,शिक्षण विषयक समस्या भेडसावत आहेत.यातून शहर व गाव असे विकसित अविकसित असमानतेचे अंतर्विरोधी द्वद्व निर्माण झाले आहे. एकदंरीत हि गावांची दयनीय स्थिती बदलण्यासाठी महात्मा गांधी यांचे ग्रामस्वराज्य विषयक विचार हे आजही कालसुसंगत असे मार्गदर्शक ठरतात.हे सिद्ध होते .

**निष्कर्ष :**

महात्मा गांधी यांनी ग्रामस्वराज्य संकल्पनेत खेडे हा घटक मूलभूत मानला आहे. स्वत्रंत भारताच्या ७५ वर्षात आजही खेडयांची स्थिती हि अविकसित अशी राहिली आहे.आजही ग्राम स्तरावर भेडसावणाऱ्या समस्यां या दिवसेंदिवस वाढत आहेत. शेती व शेतीपूरक व्यवसाय ,कुटीरउद्द्योग हे बंद पडत आहेत.उद्योग व्यवसाय अभावी बेरिजगारी.व्यसनाधीनता वाढत आहे.सामाजिक व आर्थिक स्तरावर विषमतामूलक समाजाची निर्मिती होत आहे. महात्मा गांधी यांनी ग्रामस्वराज्य संकल्पनेत सुचवलेले विचार हे आज आधुनिकतेच्या युगातही मार्गदर्शक ठरतात.

**संदर्भसूची**

१.बेडकिहाळ किशोर ,गांधीविषयी खंड १ गांधी जीवन व कार्य साधना प्रकाशन

२ भोळे भा. ल. आधुनिक भारतातील राजकीय विचार ,नागपूर पिंपळापुरे अँड कं .पुब्लिकेशर्स .

३.ग्रामस्वराज्य ,महाराष्ट्र गांधी स्मारक निधी गांधी भवन पुणे १९९५

४. गांधी एम.के. ,माझ्या स्वप्नांचा भारत ,परधाम प्रकाशन ,वर्धा २०१०.